Vol II Issue VIII Feb 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.net

**ORIGINAL ARTICLE**

# *भारतातील जातीव्यवस्था : एक अवलोकन*

रावसाहेब ज्ञानोबाराव जाधव , मिनाक्षी निवृत्ती कोंगे

[1]सहायक प्राध्यापक
[2]संशोधक विद्यार्थीनी
पाटपन्हाळा कॉलेज आर्टस , कॉर्मस – सायन्स रत्नागिरी

गोशवारा :

प्राचीन काळात जाती प्रथेविषयीचे ज्ञान धर्मग्रंथ बौध्द ग्रंथामध्ये प्राप्त होते. आणि काही सामग्री अर्थशास्त्रात पण मिळते. धर्मसुत्रामध्ये जी माहिती मिळते ती ब्राम्हण विचारधारेनूसार उपलब्ध होते. या ग्रंथामधून चार वर्ण निर्माण झाल्याचे दिसते व याच वर्णाचे रुपांतर जातीव्यवस्थेमध्ये झाल्याचे आढळते. चार वर्ण, चार जाती, शुद्र, अस्पृश्य परकीय, दास व दार्शनिक हया प्रमुख वर्गाच्या नंतरच्या काळात अनेक पोटजाती निर्माण झााल्या. वर्ण संकर, मिश्र विवाह व विवाहबाहय सबंधातून अगणीत उपजातीचा उदय झाला. प्रत्येक प्रमुख जातीच्या पोटजाती अस्तितवात आल्या. ऋग्वेदी, युजूर्वेदी, त्रिपाठी, पुरोहित (ब्राम्हण) सोमवंशी, सुर्यवंशी, रघुवंशी, सोळंकी, सेन, वर्मन, (क्षत्रिय) सार्थवाह, वैश्य, पणी (वैश्य) सुतार, लोहार, कुंभार, सोनार चर्मकार, विणकर, तेली, शेतकरी मजूर, अनुचर (शुद्र) आणि अतिशुद्र चांडाळ, अंत्यज, अस्पृश्य व दासाच्या अनेक पोटजाती, कालौघात निर्माण झाल्या, अशा प्रकारच्या शेकडो जातीचा उगम या जातीव्यवस्थेतून निर्माण झालेला निर्देशनास येतो. अशा या अमानवीय जातीव्यवस्था व तिच्या अनिष्ट परिमणामकतेमुळे येथील माणुस माणसापासून दूर दूर गेला. श्रध्दा, संस्कृती व अतिरेकी अंधश्रध्देत वाढ होऊन विज्ञानवादाकडे पाठ फिरवली गेली. परिणामी भारतास स्वातंत्र्य मिळून 65 वर्षे उलटूनही स्वातंत्र्याची फळे समाजातील शेवटच्या लोकापर्यंत पोहचण्यास अनेक अडथळे निर्माण झााली त्यामुळे भारतात विषमतेच्या दरित वाढ होऊन इंडिया – भारत असे व्दंव्द निर्माण झाल्याचे दिसून येते. म्हणून उपरोक्त समस्यांना गांभिर्यपूर्व तोंड दयावयाचे असल्यास धोरण कर्त्यांनी सर्व समावेशक धोरणांची आखनी करुन देशातील धर्मांधता कशी नष्ट होईल यावर लक्ष केंद्रित करणे क्रमप्राप्त ठरते.

### *प्रस्तावना :*

आर्य संस्कृतीपासून भारतात वर्ण व जातीवर आधारलेली वैशिष्ट्यपूर्ण समाज व्यवस्था निर्माण झालेली होती आणि तिचा प्रभाव विसाव्या शतकापर्यंत कायम होता. पण सद्यःस्थितीत ती कालबाहय व निरुपयोगी ठरलेली आहे. तिचे समर्थक व विरोधक आपापल्या भुमिका आग्रहाने मांडीत असतात. सुमारे तीन हजार वर्षे टिकून राहीलेल्या हया जातीव्यवस्थेचे काही निश्चित मर्मस्थान असावेत हे अमान्य करता येणार नाही. स्वार्थी –संकुचित प्रवृत्तीच्या मतलबी ब्राम्हणांनी वर्ण–जातीयुक्त समाजरचना टिकवण्याचा व ती वृध्दिंगत करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला, अशी ढोबळ टिका सातत्याने होत असली तरी तिच्या अस्तित्वास इतर घटकही मोठया प्रमाणात कारणीभूत होते हे अमान्य करणे अशक्य आहे.

आर्य व अनार्य संपर्कामुळे वर्णभेद (रंगभेद) जन्मास आला. आर्य गौरवर्ण तर दास कृष्ण वर्णीय हे ऋग्वेदात दोन वर्ग असल्याचे आढळते. ऋग्वेद काळाच्या शेवटी चातुवर्ण्यांचा उदय झाला. उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्था भक्कम झाली प्राचीन काळी वर्णव्यवस्था होती आणि त्यात जाती मात्र अनेक होत्या. वर्ण व जाती स्वतंत्र असल्या तरी त्या एकमेकांना पूरक होत्या. वर्ण व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवरच जातीप्रथेचा उगम व विकास झाल्याचे दिसते. म्हणून अशा हया अमानवीय जातीप्रथेचा उगम, तिची वैशिष्टपूर्ण लक्षणे कोणती व त्याचा मानवी जीवनावर काय परिणाम झाला इत्यादींचा थोडक्यात आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आलेला आहे.

### *जातीचा अर्थ :*

#### *1. मॅक आव्हर आणि पेज :*

जेव्हा दर्जा अशा पध्दतीने आधीच ठरलेला असतो की, ज्यामुळे लोकांना त्यांना मिळालेल्या दर्जाला चिकटून राहवे लागते व तो दर्जा बदलण्याची आशा नसते, तेंव्हा वर्ग जातीचे आत्यंतिक स्वरुप धारण करतो.

#### *2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते :*

बहिर्गत विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे निर्बंध असणे म्हणजे जात होय. जात हा एक बंद वर्ग होय.

**Title :** *भारतातील जातीव्यवस्था : एक अवलोकन*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** रावसाहेब ज्ञानोबाराव जाधव , मिनाक्षी निवृत्ती कोंगे **yr:2013 vol:2 iss:8.**

### उद्देश :

प्रस्तुत शोध निबंधात पुढील उद्दिश्टांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

1. जातीप्रथेच्या उत्पत्तीची कारणे शोधणे.
2. जातीप्रथेच्या लक्षणांचा आढावा घेणे.

### गृहीतके :

प्रस्तुत शोधनिबंधात उपरोक्त उद्दिष्टांचे अवलोकन करण्याकरिता पुढीलप्रमाणे गृहीतके मांडण्यात आली आहेत.

1. जातीप्रथेचे मूळ प्राचीन वर्णव्यवस्थेत आहे.
2. जातीप्रथेने मानवीमूल्यांची हानी झाली आहे.

### संशोधन पध्दती :

सामाजिक संशोधन पध्दतीतील व्यष्टी अध्ययन पध्दतीच्या अंतर्गत भारतातील जाती व्यवस्था : एक अवलोकन चा अभ्यास करण्याकरिता प्रामुख्याने दुय्यम आधार सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

हजारो वर्षाची जातीप्रथा भारतीय समाज व्यवस्थेचे अविभाज्य अंग बनुन राहीली आहे. तिचा प्रारंभ आर्य निर्मित वर्णव्यवस्थेच्या आधाराने झाला. विशिष्ट समुहात्मक परिवाराच्या चालीरीती व धार्मीक संस्कारामधून जाती प्रथेचा उदय झाल्याचे मानल्या जाते. यासबंधी डॉ. स्मिथचा दृष्टीकोन व्यवहार्य वाटतो. रॅम्सन हया विद्वानांनी गौरवर्णीय आर्य व कृष्णवर्णीय अनार्याच्या रंग भेदामधून जाती निर्माण झाल्याचे म्हटलेले आहे. परंतु त्यांच्या म्हणन्यानुसार दोन प्रकारच्या जाती (काळे – गोरे) निर्माण झाल्या असत्या तर भारतात तसे घडल्याचे आढळत नाही. रंग व जन्मावरुन जाती निर्माण झााल्याचे मत डॉ. गोखलेंनी मांडलेले आहे. तर डॉ. नेसफिल्ड यांनी शिकार, पशुपालन, व्यापार, धर्म विधी व विविध व्यावसायामुळे जाती मानण्यात आल्याचा अभिप्राय दिला आहे. परकिय गुलामगिरी प्रथेचे अनुकरण, आंतरवर्णीय – आंतरदेशीय विवाह विविध धर्मपंथाचे अनुकरण (जैन, बौध्द, शैव, वैश्णव) व ईश्वर निर्मित व्यवस्था इत्यादी कारणांमुळेही भारतात जाती निर्माण झाल्याचे मानल्या जाते. हया सर्व मत–मतांतरावरुन केवळ आर्य निर्मित वर्णव्यवस्थाच जातीच्या निर्मीतीस कारणीभूत नसून त्यासाठी उपरोक्त घटकही जबाबदार असल्याचे स्पष्ट होते. सारांश, वर्णव्यवस्था जाती निर्मितीचा घटक असून वर्णव्यवस्थेच्या विकृतीमधून जाती प्रथा उदयास आली व तिचा मानवी जीवनमूल्यावर विपरीत परिणाम होउन ती भारतातील लोकांच्या जीवन विकासात अडथळा ठरला.

जातीमुळे समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था परस्परांपासून अलिप्त राहिल्या. व्यक्तीचे दैनंदिन जीवन राजकीय घडामोडीपासून अलिप्त राहीले. जातीमुळे समाज जीवन हे स्वयंचलीत यंत्रासाखे बनले. व्यक्तीगत महत्वकांक्षा नाहीशा झाल्या. म्हणून या परिणामांचा परामर्श घेताना जातीच्या लक्षणासबंधी आजवर देशविदेशी अशा अनेक विचारवंतांनी वेगवेगळया दृष्टीकोनातून आपले विचार मांडल्याचे आढळतात. खिस्तपुर्व तिसऱ्या शतकात भारतात आलेल्या मॅगो स्थिनिज यांनी व्यवसायाची व पती पत्नीची निवड स्वतःच्याच विशिष्ट गटातून करणे या दोन सबंधाचा उल्लेख केलेला आढळतो. तर डॉ. घुर्ये यांनी जातीच्या एकुण सहा लक्षणांचा उल्लेख आदमासे 40 वर्षापूर्वी प्रथम आपल्या 'कास्ट ॲन्ड रेस इन इंडिया' या ग्रंथात प्रसिध्द केल्याचे आढळते. ती पुढील प्रमाणे आहेत.

1. जातीमुळे परस्परापासून अलिप्त अशा गटात होणारे विभाजन
2. समाजात उद्‌भवणारी उच्चनिच्च दर्जाची श्रेणी
3. एकमेकांकडे भोजन करणे व इतर सामाजिक व्यवहार ठेवणे यावरील बंधणे
4. प्रत्येकाची वस्ती अलग अलग वा सहज सबंधाला वाव न देणारी अशी असणे
5. विशिष्ट व्यवसायाची सक्ती असणे, तसेच वाटेल तो व्यवसाय स्विकारण्यास मोकळीक न देणे.
6. विवाहाचे जोडीदार, स्वजातीय असावेत असे बंधन असणे.

थोडक्यात भारतातील जाती व्यवस्थेची पाळेमुळे सनातनी हिंदू धर्मात आढळली, तरी जातीप्रथेचा स्तोम मनुस्मृतीच्या अमानवीय व्यवहारात दिसतात त्यामुळे भारतातील शुद्र अतिशुद्रांच्या सामाजिक, शैक्षणीक, सांस्कृतीक व आर्थिक विकासात प्रमुख अडथळा ठरल्याचे परिणाम आजही विकासापासून वंचित राहीलेल्या समाज घटकांच्या निरिक्षणावरुन लक्षात येते. अशा विशमताधिष्ठीत समाजरचनेची पुर्नमांडणी करुन समताधिष्ठीत समाजरचना निर्माण करण्याच्या प्रमुख उद्देशाचे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी येथील मुळ संस्कृतीची उपासना व जोपासना करणाऱ्या नागवंशीतांची भुमी असलेल्या नागपूर येथे स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाची जापासना करणाऱ्या बुध्द धम्माची दिक्षा घेतली. त्यांचे अनुकरण आंबेडकरोत्तर कालखंडात वारंवार होताना पहावयास मिळते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या यशस्वी प्रयत्नामुळे भारतात जातीप्रथा नष्ट करण्यासाठी उत्तरोत्तर धर्मांतराच्या घटना घडताना दिसून येतात व त्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मानवी मूल्यांची जोपासना करण्यास उपयुक्त ठरल्याचे स्पष्ट होते.

### संदर्भ :

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शोध व बोध, दलित मित्र रा. ना. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठाण, अक्षर श्रध्दांजली, 2005
2. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यदुनाथ थत्ते, कौस्तुभ प्रकाशन, नागपुर, 1994
3. डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर, शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन,पुणे, डिसेंबर, 2006
4. प्राचीन भारत, डॉ. रा. भी. मोरवंचीकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून 1995
5. प्राचीन भारताचा इतिहास, पी. जी. जोशी, विद्या प्रकाशन नागपूर, 2003

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net